लोकमत १०.३.२०१०

# नवीन मराठी शाळेत हास्याचा खळखळाट

**सातारा, दि. १३ (प्रतिनिधी) :** डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेत पालक संघातर्फे सर्व पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी 'हास्यसम्राट' (गंमत-जंमत) या विनोदी, मनोरंजनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चैताली माजगावकर-भंडारी यांच्या या कार्यक्रमाने नवीन मराठी शाळा जणू हास्यसागरात बुडाली.

चैताली यांचे सहकलाकार म्हणून त्यांचेच वडील सुरेंद्र माजगावकर होते. या दोघांनी एक तास सर्वांना मनमुराद हसवून हास्य दुनियेत नेले. या निमित्ताने नवीन मराठी शाळेचे चेअरमन अशोक वाळिंबे यांच्या हस्ते चैतालीला सन्मानचिन्ह देण्यात आले. बालक मंदिरचे चेअरमन राजेंद्र पवार यांच्या हस्ते सुरेंद्र माजगावकर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नवीन मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका आफळे, बालक मंदिर मुख्याध्यापिका जमदग्नी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक नवीन मराठी शाळेच्या पालक संघाच्या उपाध्यक्षा डॉ. सारिका देशपांडे यांनी केले. बालक मंदिर पालक संघाच्या उपाध्यक्षा रसिका केसकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. मंजिरी पतकी यांनी सूत्रसंचालन केले. प्रदीप कांबळे यांनी आभार मानले.




■ सातारा येथे नवीन मराठी शाळेत 'हास्यसम्राट' कार्यक्रम सादर करताना चैताली भंडारी, व्यासपीठावर मान्यवर.